अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र.टिइर्सी-२००९/(१०४/०९)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : - १५ जून, २००९ .

संदर्भ:- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र. ०८/०१/ MHA/MBA/२००८/९९, दिनांक १२ जून, २००९ चे पत्र.

**शासन निर्णय:-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस नविन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | ज्ञान, कला, क्रिडा आणि कृषि प्रतिष्ठानचे महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट ,<br>कळंब वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे ४१३११४. | एम.बी.ए. | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून नविन एम.बी. ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.

संबंधित संस्था (संचालकांमार्फत)

प्रत माहितीसाठी

अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१

सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई

निवड नस्ती.

C:\Documents and Settings\m\My Documents\Lole\TE4\Permission\Kasturi MBA.doc

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३,महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.

तार - EDUTECH E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


क्रमांक : २/एनजीसी/मान्यता/२०१२/ २०११

दिनांक : 26 NOV 2012

प्रति,
संचालक,
ज्ञान कला क्रिडा व कृषी प्रतिष्ठानचे,
महाराष्ट्र इन्स्टिटयुट ऑफ मॅनेजमेंट,
कळंब,वालचंद नगर, ता. इंदापूर,
जि. पुणे – ४१३ ११४

**(Institute Code 6140)**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व सुरु असलेल्या अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतेत बदल करण्यास परवानगी देण्याबाबत.**

संदर्भ : शासन निर्णय, क्रमांक-संकिर्ण – २०१०/(१८८/२०१०)/तांशि – ४, दि. ३०.०७.२०१०

उपरोक्त विषया संदर्भात आपणास कळविण्यात येते की, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने दिलेल्या मान्यतेस अनुसरुन शासनाने वरील संदर्भाधीन शासन निर्णयान्वये आपल्या संस्थेला शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून विना-अनुदान तत्वावर खालील प्रमाणे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम सुरु करण्यासाठी विहित अटींच्या अधिन राहून परवानगी दिलेली आहे.

| अ.क्र. | अभ्यासक्रमाचे नांव | प्रवेशक्षमता |
|---|---|---|
| ०१. | एमबीए | ६०-१२० |

संस्थेने सदर अभ्यासक्रमासाठी नियतठेव म्हणून दुस-या हप्त्याची रक्कम रु.६.०० लाख व अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेसाठी रु. १.०० लाख असे एकूण रु. ७.०० लाख बँक ऑफ महाराष्ट्र, शाखा लासुर्णे येथे खाते क्र.२०१८६७ दि.२२.१२.२०१० अन्वये संयुक्त खात्यात ५ वर्षासाठी जमा केलेले आहेत तसेच १००/- च्या स्टॅम्प पेपरवर शर्ती व अटी मान्य असल्याबाबतचे नोंदणीकृत हमीपत्र या संचालनालयास सादर केलेले आहे. तरी वरील अभ्यासक्रमाच्या प्रवेशक्षमतावाढीस व विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष २०१०-११ पासून या संचालनालयाकडून खालील अटी व शर्तीच्या अधिन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

१. सदर अभ्यासक्रमाच्या वाढीव प्रवेशक्षमतेस कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांची संलग्नता घ्यावी लागेल.

२. प्रवेशक्षमता वाढीस दिलेली मंजूरी विना-अनुदान तत्वावर राहील. त्यासाठी कोणत्याही प्रकारचे आवर्ती व अनावर्ती अनुदान शासनाकडून मंजूर केले जाणार नाही.

३ विना-अनुदान पदवी अभ्यासक्रमाच्या बाबतीत वेळोवेळी राज्यशासन अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद तसेच संचालनालयाकडून करण्यांत आलेल्या/येणा-या नियमांचे, प्रवेश नियमांचे, आरक्षण, शिक्षण शुल्क व इतर शुल्क या संबंधीच्या निर्णयांचे पालन करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. वाढीव प्रवेशक्षमतेसाठी विद्यापीठ व राज्यशासन यांच्या मानके व प्रमाणके नुसार शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांची नियुक्त करण्यांत यावी व त्यांना नियमांप्रमाणे वेतन व भत्ते देण्यात यावेत.

५. संचालक, किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद/शासनाच्या मानकाप्रमाणे जागा, इमारत, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व इतर सोयीसुविधा उपलब्ध आहेत किंवा कसे याबाबत संस्थेत केव्हाही अचानक भेट देऊन तपासणी करण्याचे अधिकार राहतील.

६. रॅगिंग संदर्भात मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोव्हिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करणे संस्थेला बंधनकारक आहे.

७. संचालनालयाच्या माहिती तंत्रज्ञान कक्षाकडून दिलेल्या संकेत क्रमाक व पासवर्डद्वारे शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या शुल्कासंबंधीत व संस्थेची इतर सर्व बाबीसंबंधीची माहिती संस्था वेळोवेळी अद्ययावत करतील.

(डॉ. सुभाष महाजन)
प्र. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई.

प्रत -

१. मा. प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई यांना संदर्भाधीन शासन निर्णयाच्या संदर्भात माहितीसाठी सादर.
२. मा. कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी सादर.
३. सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना माहितीस्तव.
४. कार्यासन क्र.२-अ, मुख्य कार्यालय, मुंबई.
५. कार्यासन क्र.३, (आय.टी.सेल) मुख्य कार्यालय, मुंबई यांना माहिती व योग्य कार्यवाहीसाठी.
६. निवड नस्ती.

अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मान्यतेनुसार राज्यातील खाजगी संस्थांना नविन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्याबाबत

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग,**
**शासन निर्णय** क्र.टिइसी-२००९/(१०४/०९)/तांशि-४,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : - १५ जून, २००९ .

संदर्भः- अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, नवी दिल्ली यांचे क्र. ०८/०१/ MHA/MBA/२००८/९९, दिनांक १२ जून, २००९ चे पत्र.

**शासन निर्णयः-** अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने त्यांच्या संदर्भाधीन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २००९-२०१० करिता खाली नमूद केलेल्या संस्थेस नविन एम.बी.ए. महाविद्यालय सुरु करण्यास खालीलप्रमाणे मान्यता दिलेली आहे. त्यास अनुसरुन याबाबत शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

| अ. क्र. | संस्थेचे नाव | अभ्यासक्रमाचे नाव | प्रवेश क्षमता |
|---|---|---|---|
| १ | ज्ञान, कला, क्रिडा आणि कृषि प्रतिष्ठानचे महाराष्ट्र इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट , कळंब वालचंदनगर, ता. इंदापूर, जि. पुणे ४१३११४. | एम.बी.ए. | ६० |

आता या शासन निर्णयाद्वारे उपरोक्त संस्थेस खालील अटी व शर्तीवर शैक्षणिक वर्ष २००९-२०१० पासून नविन एम.बी. ए. महाविद्यालय सुरु करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) प्रस्तुत बाबतीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या तसेच दिनांक २१ मे, १९८३ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या अटींची पूर्तता करणे संबंधित संस्थेस बंधनकारक राहील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेने विहित केलेल्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संस्थेस करारनामा करावा लागेल. तसेच संबंधित कागदपत्रांची आणि औपचारिक बाबींची पूर्तता संचालक ( तंत्रशिक्षण ) यांच्या संमतीने समाधानकारकरित्या करण्यात येईल.

३) सदर अभ्यासक्रमाच्या संलग्नीकरणांसाठी संबंधित संस्थेने महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील तरतूदीनुसार संबधित विद्यापिठाची मान्यता/संलग्नीकरण घेणे आवश्यक आहे.

४) संबंधित संस्थेने संचालक ( तंत्रशिक्षण ) यांचेकडे आवश्यक ती संचीत ठेव संयुक्त खात्यात भरुन इतर कायदेशीर बाबींची पूर्तता करावी.

५) सदर पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश शासनाने मान्य केलेल्या संबंधित अभ्यासक्रमाच्या प्रवेश नियमानुसार /पध्दतीनुसार करण्यात येतील.

६) शिक्षण शुल्क समितीने विहित केलेल्या शिक्षण शुल्कापेक्षा जास्त शुल्क संबंधित संस्थांनी आकारल्यास त्या संस्थांवर महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिटयूशन (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ नुसार कारवाई करण्यात येईल.

७) रॅगिंग संदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश व महाराष्ट्र प्रोहिबिशन ऑफ रॅगिंग ॲक्ट, १९९९ यांची कठोरपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

Maharashtra Institute Of Management
KALAMB
D. K. K. K. Pratishthan's

८) याशिवाय संचालक ( तंत्रशिक्षण) महाराष्ट्र राज्य, मुंबई व संबंधित विद्यापीठ यांनी घालून दिलेल्या अन्य अटी व शर्ती लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

( भ. सं. वानखेडे )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
कुलसचिव, पुणे विद्यापीठ, पुणे.
संबंधित संस्था (संचालकांमार्फत )
प्रत माहितीसाठी
अतिरिक्त सचिव (तांत्रिक), भारत सरकार, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, ७वा मजला, चंद्रलोक भवन, जनपथ, नवी दिल्ली ११०००१
सहाय्यक शिक्षण सल्लागार (तांत्रिक), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय (शिक्षण विभाग), पश्चिम विभागीय कार्यालय, इंडस्ट्रियल इन्शुरन्स बिल्डींग, दुसरा मजला, चर्चगेट, मुंबई
निवड नस्ती.

C:\Documents and Settings\m\My Documents\Lole\TE4\Permission\Kasturi MBA.doc

D. K. K. ... Institute of Management
KALAMB